पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ०६

**सभावृत्तांत**

दिनांक - **२८/०८/२०१९** वेळ - दुपारी **१२.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा **बुधवार** दिनांक **२८/०८/२०१९** रोजी दुपारी **१२.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.लांडगे राजेंद्र किसनराव - सभापती**
२. मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
३. मा.सुनिता हेमंत तापकीर
४. मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे
५. मा.बाबर शर्मिला राजू

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

अ)

विषय क्र.१) चंद्रभागा गोशाळा संवर्धन संस्था ट्रस्ट या नोंदणीकृत संस्थेस गोशाळा चालविण्यास देणेबाबत – मा.सुनिता तापकीर, मा.शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) कोंडवाडयासाठी जागा वापरास परवानगी देणेबाबत – मा.सुनिता तापकीर, मा.शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव.

----------

**खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.सुनिता तापकीर अनुमोदक – मा.शर्मिला बाबर

भारताचे माजी अर्थमंत्री व भाजपाचे जेष्ठ नेते अरुण जेटली यांचे नुकतेच दु:खद निधन झालेले असलेने सदरची सभा त्यांना श्रध्दांजली वाहून शनिवार दि.३१/०८/२०१९ रोजी दु.१२.३० वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**सभापती** - शनिवार दि.३१/०८/२०१९ रोजी दु.१२.३० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( राजेंद्र किसनराव लांडगे )**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ०६

**सभावृत्तांत**

**(** दिनांक २८/०८/२०१९ ची तहकूब सभा **)**

दिनांक - **३१/०८/२०१९** वेळ - दुपारी **१२.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची दिनांक २८/०८/२०१९ ची तहकूब सभा **शनिवार** दिनांक **३१/०८/२०१९** रोजी दुपारी **१२.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.लांडगे राजेंद्र किसनराव - सभापती**
२. मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
३. मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे
४. मा.बाबर शर्मिला राजू
५. मा.कोकणे संतोष अंकुश

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कोंद्र, मा.हरदास, मा.भागवानी – उप अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

दिनांक **१४/०८/२०१९** (कार्यपत्रिका क्रमांक **०५**) चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ११ विषय क्रमांक - ०१
दिनांक - ३१/०८/२०१९
सुचक : मा.कैलास बारणे अनुमोदक : मा.शर्मिला बाबर
संदर्भ : मा.सुनिता तापकीर, मा.शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव.

चंद्रभागा गोशाळा संवर्धन संस्था ट्रस्ट (Reg.no.MAH/473/2014/PUNE-F-44979) ही संस्था गेल्या १२ वर्षापासून गोपालन क्षेत्रात काम करीत आहे. देशी गायींचे संगोपन करणे हाच गोशाळेतील गोपालनाचा उद्येश आहे. संस्थेने मागील पाच वर्षापासून चंद्रभागा गोशाळेची स्थापना केली आहे. काळया रंगाच्या अत्यंत दुर्मिळ ३० देशी गायी संस्थेकडे आहेत. संस्थेच्या गोमाता संवर्धनासाठी विशेष योगदान देण्याचा मानस आहे. तसेच त्या अनुषंगाने दुध न देणा-या गायी, आजारी किंवा अपंग जनावरे आदींचा विशेषत्वाने सांभाळ करणे व योग्य आहार पुरविणे आदी उपक्रम संस्थेमार्फत राबविण्याचा संस्थेचा मानस आहे. सध्या मौजे चिखली, ता.हवेली, जि.पुणे येथे गायींकरीता पत्र्याची शेड बांधून संस्थेमार्फत गोशाळा उभारण्यात आली आहे. सदर जागा अपुरी असून त्यामुळे गायींची गैरसोय होत आहे. महापालिकेच्या आरक्षणाखालील चिखली गट नं.१६५५/२ पै. आरक्षण क्र.१/७९ हे क्षेत्र चिखली गुरांच्या गोठयासाठी आरक्षित आहे. तरी या जागेत महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाच्या नियंत्रणाखाली जागेचा ताबा पशुवैद्यकीय विभागाकडे ठेऊन चंद्रभागा गोशाळा संवर्धन संस्था ट्रस्ट, या नोंदणीकृत संस्थेस गोशाळा

चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.  सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १२ विषय क्रमांक - ०२

दिनांक - ३१/०८/२०१९

सुचक : मा.कैलास बारणे अनुमोदक : मा.शर्मिला बाबर

संदर्भ : मा.सुनिता तापकीर, मा.शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व्हे नं.१३१, भोसरी सदगुरुनगर येथील जागा सद्यस्थितीत वापराविना पडून आहे.  सदर जागेवर शहरातील मोकाट जनावरे, भटकी कुत्री ठेवण्यासाठी बंदीस्त कोंडवाडा तयार करुन त्यामध्ये मोकाट जनावरे, भटकी कुत्री यांचेकरीत सदर जागेचा वापर करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **राजेंद्र किसनराव लांडगे** )
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४०१/२०१९
दिनांक : ०३/०९/२०१९



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.